सकाळ




**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील समता परिषदेत बोलताना इतिहास संशोधक इंद्रजित सावंत. शेजारी शुभम शिरहट्टी, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, खासदार शाहू छत्रपती.

# शाहू महाराजांप्रती बहुजन समाजाने कृतज्ञ असावे

## इंद्रजित सावंत; विद्यापीठात समता परिषद

कोल्हापूर, ता. २५ : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचार कार्यामुळेच या देशातील दलित, बहुजनांच्या अस्तित्वाला अर्थ मिळाला आहे. त्याबद्दल आपण त्यांच्याप्रती कृतज्ञ असायला हवे, असे इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांनी आज येथे सांगितले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ जयंतीच्या पूर्वदिनी शिवाजी विद्यापीठ आणि शाहू सेना यांच्यातर्फे विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात समता परिषदेंतर्गत सावंत यांचे 'वदले शाहू छत्रपती' या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज प्रमुख उपस्थित, तर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

सावंत म्हणाले, छत्रपती शाहू महाराज हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे सच्चे वारसदार होते. शाहू महाराजांनी आपल्या पहिल्या जाहीरनाम्यातच रयतेकडून सामग्रीचा पुरवठा होत असताना त्याचा मोबदला पुरवठादारास जागेवरच आदा करण्याच्या अनुषंगाने विविध नियम घालून दिल्याचे दिसते. यामुळे शिवछत्रपतींच्या आज्ञापत्रांची आठवण झाल्याखेरीज राहत नाही.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शाहू महाराजांनी शैक्षणिक क्षेत्रासाठी केलेले कार्य खूप मोठे आहे.' प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, शाहू सेनेचे अध्यक्ष शुभम शिरहट्टी उपस्थित होते.

26 JUN 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहूंमुळेच बहुजनांच्या अस्तित्वाला अर्थ

## इंद्रजित सावंत : शिवाजी विद्यापीठात समता परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारकार्यामुळेच या देशातील दलित, बहुजनांच्या अस्तित्वाला अर्थ प्राप्त झाला आहे. त्याबद्दल आपण त्यांच्याप्रती कृतज्ञ असायला हवे, असे प्रतिपादन इतिहासाचे गाढे अभ्यासक, संशोधक इंद्रजीत सावंत यांनी बुधवारी येथे केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ जयंतीच्या पूर्वदिनास शिवाजी विद्यापीठ, शाहू सेनेतर्फे विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात समता परिषदेअंतर्गत सावंत यांचे 'वदले शाहू छत्रपती' या विषयावर व्याख्यान झाले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते. मंचावर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. प्रमुख पाहुणे खासदार शाहू छत्रपती यांच्या हस्ते रोपास पाणी घालून परिषदेचे उद्घाटन झाले.



सावंत म्हणाले, छत्रपती शाहू महाराज हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे सच्चे वारसदार होते. या दोघांच्या जीवनकार्यात, उद्दिष्टांत बहुतांश साम्य आहे. आपल्या सैन्यामुळे शेतकरी रयतेच्या भाजीच्या देठालाही धक्का लागता कामा नये, त्याचप्रमाणे मोबदला आदा करूनच लागेल तो शिधा, धान्य रयतेकडून घ्यावा, अशी छत्रपतींची आज्ञापत्रे आहेत. त्याचप्रमाणे शाहू महाराजांनी सुद्धा आपल्या पहिल्या जाहीरनाम्यातच रयतेकडून सामग्रीचा पुरवठा होत असताना त्याचा मोबदला पुरवठादारास जागेवरच आदा करण्याच्या अनुषंगाने विविध नियम घालून दिल्याचे दिसते.

समता ही केवळ घोषवाक्य नसून ती कृतीमधूनच दिसून यावी लागते. आजच्या युगात समतेच्या लढ्याला नव्या परिभाषेची गरज आहे आणि ती परिभाषा विद्यार्थ्यांच्या कृतीमधून घडेल, असे प्रतिपादन खासदार शाहू छत्रपती यांनी केले.अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, पी. सी. पाटील यांच्यापासून ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापर्यंत महाराष्ट्र घडविणारी आणि सर्वदूर प्रभाव टाकणारी मंडळी शाहू महाराजांनी तयार केली. शाहू सेनेचे अध्यक्ष शुभम शिरहट्टी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले.

26 JUN 2025
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहू महाराजांप्रति बहुजन समाजाने कृतज्ञ असावे

## इंद्रजित सावंत; शिवाजी विद्यापीठात छत्रपती शाहू जयंतीनिमित्त विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचार कार्यामुळेच या देशातील दलित, बहुजनांच्या अस्तित्वाला अर्थ प्राप्त झाला आहे. त्याबद्दल आपण त्यांच्याप्रती कृतज्ञ असायला हवे, असे प्रतिपादन इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांनी केले. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ जयंतीच्या पूर्वदिनास शिवाजी विद्यापीठ आणि शाहू सेना यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात समता परिषदेत ते 'वदले शाहू छत्रपती' या विषयावर बोलत होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'वदले शाहू छत्रपती' या विषयावर बोलताना इतिहास संशोधक इंद्रजित सावंत.**

इंद्रजित सावंत म्हणाले, छत्रपती शाहू महाराज हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे सच्चे वारसदार होते. या दोघांच्या जीवनकार्यात, उद्दिष्टात बहुतांश साम्य आहे. त्याचप्रमाणे शाहू महाराजांनीसुद्धा आपल्या पहिल्या जाहीरनाम्यातच रयतेकडून सामग्रीचा पुरवठा होत असताना त्याचा मोबदला पुरवठादारास जागेवरच अदा करण्याच्या अनुषंगाने विविध नियम घालून दिल्याचे दिसते. यामुळे शिवछत्रपतींच्या आज्ञापत्रांची आठवण झाल्याखेरीज राहत नाही. अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, शाहू महाराजांनी शैक्षणिक क्षेत्रासाठी केलेले कार्य खूप मोठे आहे. त्यांनी महाराष्ट्र घडविणारी व्यक्तिमत्त्वे तयार केली.

प्रास्ताविकात शाहू सेनेचे अध्यक्ष शुभम शिरहट्टी म्हणाले, शाहू महाराज हे केवळ सामाजिक क्रांतीचे प्रणेतेच नव्हते, तर शिक्षण, आरक्षण, स्त्री सक्षमीकरण आणि शोषित घटकांच्या उन्नतीसाठी कृतिशील राजकारण करणारे पहिले भारतीय राजे होते. मंचावर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. आभार डॉ. तानाजी चौगुले यांनी मानले.

सकाळ

# पुनर्प्रवेश परीक्षेचा अर्ज भरताना महाविद्यालयाचा पसंतीक्रम देता येणार

कोल्हापूर, ता. २५ : विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी १० जुलैला होणाऱ्या पुनर्प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज भरतानाच महाविद्यालय पसंतीक्रम देण्याची सुविधा संगणकीय प्रणालीत केल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाच्या पी. जी. ॲडमिशन विभागाने आज दिली.

विद्यार्थ्यांनी २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रियेबाबत वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर भेट देऊन प्रवेश प्रक्रियासंदर्भात माहिती घेण्याबाबत कळवले आहे. प्रवेश अर्ज भरण्यासाठी, पसंतीक्रम निवडण्याच्या माहितीसाठी व्हिडिओ तयार करून प्रवेश प्रक्रिया पोर्टलला प्रसिद्ध केला आहे. प्रवेश परीक्षा असलेल्या आणि प्रवेश परीक्षा नसलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासंदर्भातील प्रवेश प्रक्रिया वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी एम.एस्सी.अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा दिली आहे. परंतु, अद्यापही महाविद्यालयाचा पसंतीक्रम दिलेला नाही. ज्यांना पसंतीक्रम सुधारित करावयाचा आहे, अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठ अधिविभाग, महाविद्यालयाचा पसंतीक्रम देण्यासाठी ८ जूनअखेर मुदतवाढ देण्यात आली. त्याची नोंद घ्यावी, अशा आशयाची सूचना विद्यापीठ अधिविभाग, सर्व संलगिनत महाविद्यालये यांना पाठवली होती. विद्यार्थ्यांनाही याबाबत माहिती त्यांच्या मोबाईलवर संगणक केंद्रातर्फे पाठविली आहे. बहुतांश विद्यार्थ्यांनी नेट कॅफेमधून प्रवेश अर्ज भरले आहेत. नेट कॅफेचालकांनी याबाबत विद्यार्थ्यांना काही कल्पना न दिल्यामुळे विद्यार्थ्यांचे पसंती क्रम देण्याचे प्रमाण कमी आहे. संगणक केंद्रातर्फे विद्यार्थ्यांना पसंतीक्रम देण्याबाबत दूरध्वनीवरून मार्गदर्शन केल्याची माहिती पत्रकाद्वारे दिली.

सकाळ

# दूरशिक्षण केंद्रातर्फे एमबीएसाठी फेर प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या एम. बी. ए. (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी रिक्त जागांकरिता फेर प्रवेश १५ जुलै रोजी परीक्षा होणार आहे. या अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे प्रवेश इच्छुकांना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रॉडक्शन व्यवस्थापन, तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एम. बी. ए. (डिस्टन्स मोड) अभ्यासक्रम पूर्ण करता येणार आहे. अभ्यासक्रमासाठी प्रवेश निश्चित करायचा आहे. त्यांनी ७ जुलैपर्यंत प्रवेश परीक्षा अर्ज भरावा. एमएचटी-सीईटी, एटीएमए, सीईटी दिली असेल त्यांना थेट प्रवेश घेता येईल, असे दूरशिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी केले.

तरुण भारत

# गोखले कॉलेजमध्ये एमबीए अभ्यासक्रमास मान्यता

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र मान्यताप्राप्त एम. बी. ए अभ्यासक्रास मान्यता मिळाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांना दि ७ जुलै पर्यंत ऑनलाईन फॉर्म भरणेची सुविधा गोपाळ कृष्ण गोखले कॉलेजमध्ये सुरु आहे. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ. आर. बी. भुयेकर यांनी केले आहे.

